प्रथम 1 वर्धापन दिन...

दैनिक
# यश सिद्धि न्यूज
RNI NO. MAHMAR/2023/84162
YASH SIDDHI NEWS

वर्ष २ रे | अंक ०१ ला | शनिवार १८ मे २०२४ | पाने ४ | किंमत ४ रु/-
| * Volume 2 | Issue 01 | Date : 18/05/2024 blow Saturday Page 4 Price 4






संपादक दैनिक यशसिध्दि न्यूज
उपसरपंच गोगांव ग्रामपंचायत
महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघ मुंबई,
शाखा अक्कलकोट तालुकाध्यक्ष

मा.श्री.
## कमलाकर सोनकांबळे

यांना वाढदिवसानिमित्त
हार्दिक शुभेच्छा..!!

प्रथम 1 वर्धापन दिन...

## दैनिक यश सिध्दि न्यूज

प्रथम वर्धापन
दिनानिमित्त
हार्दिक
शुभेच्छा..!!



शुभेच्छुक

सिध्दार्थ सोशल फौंडेशन
महाराष्ट्र राज्य

दैनिक यशसिध्दि न्यूज परिवार
महाराष्ट्र राज्य

# संपादकीय

## हे थांबविले पाहिजे...

भारत जगातील तिसऱ्या क्रमांकाचा प्रदूषित देश असून बिहारमधील बेगुसराई हे जगातील सर्वाधिक प्रदूषित महानगर क्षेत्र तर जगातील १३४ देशांच्या राजधानीच्या शहरांपैकी दिल्ली हे सर्वात प्रदूषित राजधानीचे शहर असल्याची नोंद या अहवालात करण्यात आली आहे. या अहवालाच्या निर्मितीसाठी वातावरणातील प्रदूषणकारी घटक म्हणून ओळखल्या जाणाऱ्या पीएम - २.५ कणांचे प्रमाण बारकाईने तपासण्यात आले होते. जगातील १३४ देशांमध्ये बसविण्यात आलेल्या ३० हजार ग्राउंड मॉनिटरच्या माध्यमातून ७३०० शहरांची माहिती संकलित करण्यात आली. या अहवालातील निष्कर्ष पाहिल्यानंतर भारतातील प्रदूषणाची समस्या किती गंभीर आहे हे लक्षात येईल. विशेष म्हणजे जगातील सर्वाधिक प्रदूषित शहरांच्या यादीत भारतातील दिल्ली, मुंबई, बेगुसाराई, गुवाहाटी, कोलकाता, हैदराबाद, चेन्नई यासारख्या मोठ्या आणि महत्वाच्या शहरांचा समावेश आहे. या शहरात वातावरणातील प्रदूषणकारी घटक म्हणून ओळखल्या जाणाऱ्या पीएम - २.५ कणांचे प्रमाण ५३.३ मायक्रोग्राम क्यूबिक मीटर या पातळीवर आले असून ते आरोग्य संघटनेने निर्धारित केलेल्या सुरक्षेच्या पातळीपेक्षा दहापटीने अधिक असल्याचे दिसून आले. स्विस संस्थेचा हा अहवाल देशातील नागरिकांची झोप उडवणारा आहे, कारण आज देशातील सर्वच महत्वाची शहरे प्रदूषणाने गुदमरत आहेत. त्या शहरात राहणाऱ्या नागरिकांचे जीवन प्रदूषणामुळे धोक्यात आले आहे. एकीकडे २१ व्या शतकातील सुखासीन जीवनाचे मनोहरी चित्र उभे केले जात आहे. स्मार्ट सिटीचे स्वप्न दाखवले जात आहे तर दुसरीकडे याच शहरांची फुफ्फुसे प्रदूषणाने निकामी होत आहेत. प्रदूषणामुळे या शहरातील नागरिकांचे आरोग्य धोक्यात आले आहे. प्रदूषणामुळे या शहरातील नागरिकांना फुफ्फुसाचे, हृदयाचे, रक्ताभिसरणाचे आजार मोठ्या प्रमाणावर होत आहेत. न्यूमोनिया, पक्षघात, हृदयविकार, फुफ्फुसाचा कर्करोग यासारखे मोठे आजार प्रदूषित हवेमुळेच होत आहेत. प्रदूषणामुळे दिल्लीसारख्या देशाच्या राजधानीची काय अवस्था झाली हे आपण पाहत आहोतच. प्रदूषणामुळे दिल्लीतील शाळा कॉलेजसना सुट्टी देण्याची वेळ प्रशासनावर आली होती. प्रदूषणामुळे दिल्लीत खेळला जाणारा रणजी सामना रद्द करावा लागला होता. चार वर्षांपूर्वी दिल्लीत इंग्लंड आणि भारत यांच्यात झालेल्या कसोटी सामन्यात खेळाडू चक्क मास्क लावून मैदानात उतरले होते. नंतर हा सामना देखील प्रदूषणामुळे रद्द करावा होता त्यामुळे भारताची जगात नाचक्की झाली होती. जे दिल्लीत आहे तेच मुंबईत आहे. देशाची आर्थिक राजधानी असलेली मुंबई प्रदूषणाच्या बाबतीत देशाच्या राजधानीची बरोबरी करू लागली आहे. मुंबईचे प्रदूषणही उच्चतम पातळीवर पोहचले आहे. प्रदूषणामुळे लोकांना शुद्ध हवा मिळणे दुरापास्त झाले आहे. शुद्ध हवेसाठी लोकांना पैसे मोजावे लागत आहे. मुंबई - दिल्लीसारख्या मोठ्या लोकसंख्येच्या शहरात ऑक्सिजन बार सुरू करण्यात आले आहेत. एका तासाला २०० ते ५०० रुपये मोजून नागरिक ऑक्सिजन विकत घेत आहेत. इतके होऊनही आपण त्यातून बोध घेत नाही. या मोठ्या शहरात वाहनांची संख्या मोठ्या प्रमाणात वाढत आहे. मुंबई, पुणे, नागपूर यासारख्या मोठ्या शहरात लोकसंख्येपेक्षा वाहनांची संख्या अधिक आहे. वाढत्या वाहनांमुळे प्रदूषणात भर पडत आहे. वाहनातून बाहेर पडणाऱ्या धुरात प्रदूषणाचे प्रमाण खूप असते. धूळ, कारखान्यातून निघणारा धूर, बांधकामातून पसरणारे कण, वृक्षतोड, पृथ्वीचे वाढते तापमान, प्लास्टिकचा भस्मासुर अशा अनेक कारणांमुळे प्रदूषणाचा आलेख उंचावत आहे. स्विस संस्थेने जाहीर केलेला हा अहवाल म्हणजे धोक्याची घंटा आहे. वाढते प्रदूषण कमी करण्यासाठी वेळीच ठोस उपाय करायला हवेत. कारखान्यातून बाहेर पडणाऱ्या धुरातून प्रदूषणकारी घटक कमी करण्यासाठी अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करायला हवा. दगड खाणींवर नियंत्रण आणायला हवे. वाहनांची संख्याही कमी करायला हवी. प्रसंगी सम - विषम सारखे कठोर निर्णय घ्यायला हवेत. युरोपीय देशात प्रदूषण कमी करण्यासाठी काय उपाययोजना केल्या जातात याचा अभ्यास करायला हवा. नागरिकांनी सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेचा अधिकाधिक वापर केला पाहिजे.

# संघर्षाच्या आगीतून निर्माण झालेला संपादक कमलाकर सोनकांबळे

**दैनिक यशसिद्धि न्युजचे संपादक, व सामाजिक कार्यकर्ते तथा गोगांव ग्रामपंचायत उपसरपंच कमलाकर सोनकांबळे यांच्या वाढदिवासानिमित्त प्रथम खूप खूप शुभेच्छा**

गोगांव सारख्या ग्रामीण भागात राहून सामाजिक न्याय हककासाठी लढणारा सामान्य गरीब कुटूबातील व्यक्ती आज पत्रकारिता सोबत सामाजिक, राजकीय क्षेत्रात यशस्वी होताना दिसून येतो

राजवा आई ज्ञानदेव वडील यांचे तिसरे अपत्य कमलाकर सोनकांबळे शाळेत अभ्यासात कमी असल तरी सामाजिक कार्यात सक्रिय सहभाग असायचं गावामध्ये जिल्हा परिषद शाळा झाल्यानंतर वागदरी येथील श्री एस एस शेळके प्रशालेत दहावी पर्यंत शाळा घेऊन मुरूम येथील ज्युनियर कॉलेज मध्ये १२ शिक्षण घेत असताना पत्रकारिता करण्याचे अवड निर्माण झाले त्यावेळी कॉलेज युवकांसाठी दैनिक संचार मध्ये तारुण्यादुत व दैनिक लोकमत मध्ये युवामंच नावाचा उपक्रम राबविले जात त्यामध्ये कॉलेजचे नेतृत्व दोन्ही वृत्तपत्रात कॉलेज प्रतिनीधी म्हणून काम केले त्यानंतर साप्ताहिक सत्यप्रिय मध्ये कार्यकारी संपादक व साप्ताहिक कालिगंगा मध्ये क्राईम रिपोर्टर म्हणून काम करत असताना स्वतचे एक वृत्तपत्र असायला हवे असे त्यांना कायम वाटायचे परंतु परस्थिती मुळे काहीच करता येत नसायचे

तीन भावा पैकी एकट्याचे सहावी शाळेत असताना अचानक मयत झाले मोठा भाऊ शिक्षणामध्ये हुशार वडील गंवडी काम करून मोठ्या मुलाला महापारेषण मध्ये नोकरी लावले वडील हे शाळेत गेले नसले तरी त्यांना शिक्षणाचे महत्व माहिती होते त्यांनी प्रौढ शिक्षण घेऊन अनेक विद्वान लोकांना कुठल्याही विषयावर तासान तास चर्चा करत भारुड, व भजन गायनानी ते प्रसिद्ध होते वडिलांच्या अंगातील सामाजिक गुणाचे वारसा पुढे मुलगा वृत्तपत्राच्या माध्यमातून सुरुवात ठेवलय हे अभिमानाचे गोष्ट आहे

सामाजिक कार्य करत असताना अनेक जातीवादी लोकांना संघर्ष करून सामाजिक न्याय देण्याचे काम तालुक्यासह महाराष्ट्र करत आहेत. विविध क्षेत्रात ते काम करत असताना सम्यक बहुउद्देशीय सहकारी संस्थेचे चेअरमन, सम्यक उद्योग समूहाचे चेअरमन, महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघाचे अक्कलकोट तालुकाध्यक्ष, ज्या मालकीचे वृत्तपत्र चालवली जात आहे अशा सिद्धार्थ सोशल फाउंडेशन अध्यक्ष म्हणून ही ते काम पाहत आहेत सामाजिक उपक्रमासोबत आर्थिक उन्नती युवकांना मिळण्यासाठी ते प्रयत्नशील असतात व शासकीय योजनांचे लाभार्थी मिळण्यासाठी प्रयत्न करत असतात, कोरोना काळात सोलापूर,अक्कलकोट व पुण्यासारख्या शहरात सिद्धार्थ सोशल फाउंडेशन संस्थेच्या माध्यमातून चंद्र शेखर भांगे व सुनील गायकवाड या संचालकाच्या माध्यमातून मोफत किट वाटप करण्यात आले आहे त्यासोबत कोरोणा विषय जनजागृती करण्यात आहे आहेत

गावाचे उपसरपंच झाल्यापासून गावाच्या विकासासाठी सरपंच वनिता सुरवसे, जेष्ठ सदस्य प्रदीप जगताप यांच्या मार्गदर्शनखाली डॉ बाबासाहेब आंबेडकर नगर मध्ये विविध विकास कामे चालू आहेत आमदार सचिन कल्याणशेट्टी यांच्या माध्यमातून मागासवर्गीय समाजाच्या स्नमशन भूमी शेड काम करून घेण्यात आले असून त्या ठिकाणं पर्यंत सिमेंट कॉंक्रिट रस्ता करण्यात




आले आहे त्यासोबत डॉ बाबासाहेब आंबेडकर सांस्कृतिक सभागृह व डॉ बाबासाहेब आंबेडकर भवन काम प्रगती पथावर आहे त्यासोबत आमदार कपिल पाटील यांच्या माध्यमातून अँड. सचिन बनसोडे यांच्या पाठपुराव्याने डॉ बाबासाहेब आंबेडकर नगर येथे लवकरच डॉ बाबासाहेब आंबेडकर स्मारक काम सुरुवात होणार असून मागासवर्गीय विद्यार्थ्यांना व वंचित घटकातील मुलांना अभ्यासाचे गोडी लागावे म्हणून लवकरच त्याठिकाणी अभ्यासिका केंद्र ही चालू करण्याचे काम चालू करण्यात येणार आहे असे दिव्य भव्य असा समाज निर्मितीसाठी कमलाकर सोनकांबळे हे उपसरपंचच्या माध्यमातून काम करत आहेत

समाजाच्या तळपातळीतून आलेल्या कार्यकर्त्याला हा वाढदिसानिमित्त सन्मान म्हणजे पत्रकारिता क्षेत्रात काम करण्याची संधी व आव्हाने पेलण्याची, कार्यक्षमता सिद्ध करण्याची वेळ उपलब्ध झाले आहे. वार्तांकन करणारे पत्रकार, संपादक, वर्तमानपत्रे, नियतकालिके या क्षेत्रामध्ये अलिकडच्या काळातील नव नवीन विषयावर लिहिण्याची, प्रबोधन करण्याची व सामाजिक आर्थिक लोकशाही निर्माण करण्याची संधी हे प्रसार माध्यमांना असते. लोकशाही निर्माण करण्यासाठी व वृद्धिंगत करण्यासाठी प्रसार माध्यमांचा सहभाग आहे. भारतीय संविधानाला अभिप्रेत असलेला आदर्श समाज निर्माण करण्यासाठी प्रसारमाध्यमे, न्यायपालिका, विधिमंडळ, लोकसंसद, हे महत्त्वाचे घटक आहेत. अतिशय महत्त्वाचा स्तंभ मानला जातो. नव्हे तर समताधिष्ठित समाज निर्माण करणारे प्रसार माध्यमे हा लोकशाहीतला अविभाज्य घटक मानला जातो. या क्षेत्रामध्ये अनेक पत्रकार, वार्ताहर, विचारवंत, व साहित्यिकांनी योगदान दिले आहे. या क्षेत्रात कमलाकर सोनकांबळे यांनी देखील आपला सहभाग नोंदविला आहे. आत्तापर्यंत रोखठोक, परखड व थेट भूमिका घेऊन जनतेचे प्रश्न मांडण्याचा पवित्रा घेतला आहे. राजकीय, सामाजिक, आर्थिक व सांस्कृतिक चळवळीच्या हेतूंचे परखड विश्लेषण करत जनतेपर्यंत पोहोचविण्याचे कार्य केले आहे. संविधानाला अभिप्रेत असलेल्या वैज्ञानिक दृष्टिकोन सार्वत्रिक व्हावा यासाठी ते स्वतंत्रपणे भूमिका घेताना दिसत आहेत. सध्या शेतकरी, महिला, मजूर, कष्टकरी, विद्यार्थी, वृद्ध वा जेष्ठ नागरिकाचे प्रश्न याविषयीची चर्चा घडवून आणणे विचार बनवा करताना त्यांचे दैनिक काम करताना दिसत आहे. हल्ली असे प्रश्न अतिशय हळुवारपणे हाताळणे गरजेचे आहे. परखड चिकित्सा, रोखठोक टीका ... त्यांच्या दैनिक यशसिद्धि न्युजच्या माध्यमातून आधुनिक विचारांचा वेध घेण्याचा सातत्याने प्रयत्न केला आहे. जनतेतला भ्रम आणि संभ्रम दूर करण्यासाठी त्यांचे लेखन उपयुक्त ठरले आहे. यातूनच मूक क्रांतीकडे चाललेल्या नव्या भारताची जडणघडण होण्यास त्यांचे योगदान पोषक ठरत आहे. यामुळे प्रसार माध्यमांची भूमिका मध्यवर्ती ठरली आहे. या पार्श्र्वभूमीवर कमलाकर सोनकांबळे यांचा सन्मान योग्य वाटतो.

या सर्व संघर्ष जीवन जगत असताना भावाच्या प्रेमाचे आशीर्वाद भिऊ नको मी तुझ्या पाठीशी आहे व गुरुवर्य यांचा फक्त तू लढ समाजाच्या हितासाठी, गावाच्या विकासासाठी, देशाच्या प्रगतीसाठी हे वाक्य जगण्याला प्रेरणा देणारे असतात लोकशाहीवादी मूल्यांची पेरणी करणारे कमलाकर सोनकांबळे हे आंबेडकर चळवळीतील दीर्घकाळ चालणारे एक मुखपत्र म्हणून ओळखले जाते त्या वर्तमानपत्राचे ते संपादक आहेत. सोलापूर जिल्ह्यातील व आसपासच्या विविध गावातील राजकीय भूमिका सामाजिक घडामोडी इत्यादी अनेक वर्ष ते वार्तांकन करत आहेत त्यांचे भिमा कोरेगावचे इतिहास सांगतो महार रेजिमेंट सैनिक यश सिद्धि ब्रीद वाक्य घेऊन जसा इतिहास घडवला तसा दैनिक यश सिद्धि न्यूज भविष्यात सामान्य बहुजन समाजाला न्याय देण्यासाठी लढा देईल अशी आशा व्यक्त करतो, सध्या वाचक, विद्यार्थी, अनेक अभ्यासक, महिला, कष्टकरी व अनेक स्तरातून त्याचे वाचन केले जाते. अल्पकाळातच ते एक लोकप्रिय दैनिक म्हणून पुढे आलेले आहे. या परिसरातील अनेक महत्त्वाच्या क्षेत्रावर त्यांनी वार्तांकन करून आपले स्थान मजबूत केले आहे. कमलाकर सोनकांबळे संपादक म्हणून आंबेडकर चळवळीतील संपूर्ण चळवळीचा रचनात्मक अभ्यास व त्याची मांडणी करताना दिसून येतात. प्रत्येक समाजाला त्याचा सन्मान, स्वाभिमान व स्वावलंबन आवश्यक असते. जगण्याचा हक्क मिळावा... यासाठी ते नेहमी अशा प्रश्नावर ठसठशीत प्रकाश टाकताना दिसून येतात. सोनकांबळे हे आंबेडकरवादी भूमिकेतून लेखन प्रदर्शित करत असतात. व्यक्ती स्वातंत्र्य, मानवी अधिकार, जगण्याचा हक्क, सन्मान हा प्रत्येक समाजातील घटकाला मिळाला पाहिजे. दुर्बल, वंचित, उपेक्षित बांधवांना शिकण्याची व संघटन करण्याची प्रेरणा मिळायला हवी. यासाठी ते सतत समाजातील एकात्मता, समानता, बंधुभाव व सामाजिक न्याय या क्षेत्रावर त्यांनी सदैव लेखन करत असल्याचे दिसून येते. या पुढील काळात संविधान मूल्य मांडून त्यावर लोकांचे मत परिवर्तन करण्याची तळमळ त्यांच्यामध्ये आहे. बाबासाहेबांच्या संविधानवादी व धम्म प्रबोधन चळवळीतूनच प्रेरणा घेऊन तरुण पिढी नवभारताच्या चळवळीत महत्त्वपूर्ण योगदान कसे देता येईल याविषयी त्यांचं वार्तांकन व लेखन महत्त्वाचे, उपयुक्त व उदबोधक ठरले आहे. राजकीय सामाजिक आर्थिक धार्मिक सांस्कृतिक या क्षेत्रात एक वैचारिक क्रांती कशी घडून येईल ? माणसाला माणूस म्हणून कसे जगता येईल याकरता त्यांनी पत्रकारितेच्या माध्यमातून संघर्ष संघर्षमय प्रवास अतिशय मनोरंजक व उद्बोधक आहे.

कमलाकर सोनकांबळे यांच्या वाढदिवासानिमित्त व दैनिक यश सिद्धि न्युजच्या प्रथम वर्धापन दिनानिमित्त आपणास व दैनिक यश सिद्धि न्युजला पुढील वाटचालीस हार्दिक हार्दिक शुभेच्छा....! **डॉ. डी. टी. गायकवाड, पुणे ( लेखक, साहित्यिक, ) मो. ९८६०५९१३०५**

# महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे प्रदेश अध्यक्ष वसंतराव मुंडे यांचा तुळजापूर येथे सत्कार

वागदरी/एस.के.गायकवाड : महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ मुंबईचे महाराष्ट्र प्रदेश अध्यक्ष वसंतराव मुंडे यांचा तुळजापूर येथे महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ मुंबई तालुका शाखा तुळजापूरच्या वतीने सपत्नीक सत्कार करण्यात आला.

दि.१६ मे २०२४ रोजी महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ मुंबईचे महाराष्ट्र प्रदेश अध्यक्ष वसंतराव मुंडे व त्यांच्या पत्नी सौ.वनिता वसंतराव मुंडे हे महाराष्ट्राची कुलस्वामिनी आई तुळजाभवानी मातेच्या दर्शनासाठी तुळजापूर येथे आले असता महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ तालुका शाखा तुळजापूरच्या वतीने त्यांच्या सत्काराचे आयोजन करण्यात आले होते.



या प्रसंगी पत्रकार संघाचे तुळजापूर तालुका अध्यक्ष अरुण लोखंडे व सामाजिक कार्यकर्त्या अन्नपुर्णा मोरे यांच्या हस्ते तुळजाभवा मातेची प्रतिमा, कवड्याची माळ,शाल, पुष्पहार देवुन यथोचित त्यांचा सपत्नीक सत्कार करण्यात आला.

या कार्यक्रमाचे प्रास्ताविक व सूत्रसंचलन पत्रकार संघाचे मंत्रालयीन प्रतिनिधी अहमद शेख यांनी केले तर आभार प्रदर्शन पत्रकार संघाचे तालुकाध्यक्ष अरुण लोखंडे यांनी केले.आपल्या आभार प्रदर्शनपर भाषणात बोलताना अरूण लोखंडे म्हणाले की महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे प्रदेश अध्यक्ष वसंतराव मुंडे हे महाराष्ट्रातील तमाम पत्रकारांचे प्रेरणा स्थान असून विशेषतहा ग्रामीण भागातील पत्रकारांच्या प्रश्र्नांनाची त्यांना जाणीव आहे.त्यामुळे ते पत्रकारांना न्याय मिळवून देण्यासाठी सतत प्रयत्न करतात. यावेळी जेष्ठ पत्रकार इरफान काझी, आप्पा भिसे,राम कांबळे,अक्षय कांबळे,बालाजी घोटमुकले,सह पत्रकार उपस्थित होते.

# महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघाचे प्रदेशाध्यक्ष वसंतराव मुंडे यांचा श्री विठ्ठल रुक्मिणी मातेच्या दर्शनासाठी आले असता त्यांचा सत्कार

पंढरपूर/प्रतिनिधीः महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघ मुंबई महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष वसंतराव मुंडे यांच्या पंढरपूर येथे महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघ मुंबई व पंढरपूर तालुका अध्यक्ष व शहराध्यक्ष यांच्या वतीने सत्कार करण्यात आला

दिनांक १६ मे २०२४ रोजी महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघाचे मुंबईचे प्रदेशाध्यक्ष वसंतराव मुंडे व त्यांच्या पत्नी सौ वनिता वसंतराव मुंडे हे महाराष्ट्राचे आराध्य दैवत श्री विठ्ठल रुक्मिणी मातेच्या दर्शनासाठी पंढरपूर येथे आले असता महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघ पश्र्चिम महाराष्ट्राचे अध्यक्ष राजेंद्र कोरके पाटील तालुका अध्यक्ष रामदास नागटिळक सरपंच पंढरपूर शहराध्यक्ष विनोद पोद्दार पंढरपूर कार्याध्यक्ष नागेश शहादापुरे पंढरपूर प्रसिद्धीप्रमुख दादा कदम पंढरपूर तालुका उपाध्यक्ष रवी कोळी व पंढरपूर शहर सदस्य राजेंद्र पवार यांच्या वतीने सत्काराचे आयोजन करण्यात आले होते या




प्रसंगी पत्रकार संघाचे प्रदेश महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघाचे पश्र्चिम महाराष्ट्र कार्याध्यक्ष राजेंद्र कोरके पाटील पंढरपूर तालुकाध्यक्ष रामदास नागटिळक सरपंच कवठाळी तसेच पंढरपूर कार्याध्यक्ष नागेश शहादापुरी शहराध्यक्ष विनोद पोतदार पंढरपूर शहर व तालुका उपाध्यक्ष रवी कोळी तालुका प्रतिनिधी प्रमुख दादा कदम व शहर सदस्य राजेंद्र पवार इत्यादी व सामाजिक कार्यकर्ते उपस्थित होते त्यांचा सत्कार महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघाचे पश्र्चिम महाराष्ट्राचे कार्याध्यक्ष राजेंद्र कोरके पाटील व तालुकाध्यक्ष रामदास नाटक त्यांना शाल व श्रीफळ व श्री विठ्ठलाची मूर्ती देऊन त्यांचा येतोच सत्कार करण्यात आला

हे वृत्तपत्र मालक, सिद्धार्थ सोशल फौंडेशन यांनी, मुद्रक, प्रकाशक, संपादक, कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे यांच्या सम्यक पब्लिकेशन्स अँड प्रिंटर्स २४७, बुद्ध विहार , रमाबाई आंबेडकर नगर, बुधवार पेठ सोलापूर ४१३००२ महाराष्ट्र येथे छापून मु.पो. गोगांव ता. अक्कलकोट जि सोलापूर ४१३२१८ महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. संपादक : कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे email ; yashsiddhinews@gmail.com www.yashsiddhinews.com mo: 9921988358

This newspaper is printed by the Owner , Shidharth Social Foundation, Printer, Publisher, Editor, Kamalakar Dayndev Sonakamble at Samyak Publications and Printers 247, Budha Vihar, Ramabai Ambedkar Nagar, Budhwar Peth Solapur 413002 [Maharashtra], Published, at Gogaon Tal Akkalkot Dist Solapur 413218 [Maharashtra]. Editor : Kamalakar Dayndev Sonakamble

# टाकळीवाडीतील जागृत देवस्थान श्री म्हसोबा व लक्ष्मी यात्रा मोठ्या उत्साहात संपन्न

पत्रकार नामदेव निर्मळे

टाकळीवाडी तालुका शिरोळ येथील जागृत देवस्थान श्री म्हसोबा व लक्ष्मी यात्रा दरवर्षीप्रमाणे या ही वर्षी सुद्धा मोठ्या उत्साह संपन्न झाली. पालखी मिरवणूक मोठ्या उत्साहात काढण्यात आली. पालखी मिरवणुकीच्या रात्रीच वळीव पावसाने हजेरी लावल्याने अनेक शेतकरी सुखावले. म्हसोबा देवाचा आहेर मानपान करण्यात आली.व त्यानंतर महाप्रसादाचा कार्यक्रम संपन्न झाला. लक्ष्मी देवीची ओटी भरण्यात आली. महाप्रसादाचे आयोजन केले होते. म्हसोबाची बहिण लक्ष्मी देवीची यात्रा सुद्धा गावकऱ्यांच्या सहकार्याने संपन्न झाली. गावचे श्रद्धास्थान असे संबोधले जाते.

# इथेनॉलवरील निर्बंध केंद्राकडून मागे; तेल कंपन्यांकडून लवकरच खरेदी

मुंबई : उसाचा रस किंवा मळीपासून इथेनॉल निर्मितीवरील निर्बंध केंद्र सरकारे हटविले असून देशभरातील कारखान्यांकडे शिल्लक असलेले सुमारे तीन हजार कोटींचे इथेनॉल खरेदी करण्याचे आदेश पेट्रोलियम कंपन्यांना दिले आहेत. त्यानुसार राज्यातील सुमारे ११०० कोटींचे इथेनॉल खरेदी करण्याची प्रक्रिया पेट्रोलियम कंपन्यांनी सुरू केली असून त्यासाठी निविदाही काढण्यात आल्याची माहिती मंत्रालयातील वरिष्ठ अधिकाऱ्याने दिली.

देशातील साखरटंचाई आणि साखरेच्या दरातील चढउतार टाळण्यासाठी केंद्र सरकारने ६ डिसेंबर २०२३ रोजी उसाचा रस आणि बी- हेवी मोलाईसेस(मळी) पासून इथेनॉल उत्पादन आणि खरेदीवर बंदी घातली होती. केंद्राने ही बंदी घातली त्या वेळी देशभरात सुमारे पाच ते सात लाख टन मळीचा ( बी- हेवी मोलाईसेस) साठा शिल्लक होता. एकट्या महाराष्ट्रात उसाचा रस, मळीचा सुमारे ११०० कोटींच्या किमतीचा साठा गेल्या सहा महिन्यांपासून शिल्लक आहे. त्याचे वेळीच इथेनॉलमध्ये रूपांतर केले झाले नाही तर हा साठा वाया जाणार आहे. याची उपयुक्तता संपण्यापूर्वी इथेनॉल निर्मितीस परवानगी देण्याची विनंती राज्य साखर संघ आणि राष्ट्रीय सहकारी साखर कारखाना महासंघाने पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्याकडे केली होती. राज्य साखर संघाचे अध्यक्ष पी.आर. पाटील आणि व्यवस्थापकीय संचालक संजय खताळ यांनी याबाबतची समस्या केंद्राच्या निदर्शनास आणून दिली. राष्ट्रीय सहकारी साखर कारखाना महासंघाचे अध्यक्ष हर्षवर्धन पाटील यांनीही सहकारमंत्री अमित शहा यांची भेट घेऊन इथेनॉल निर्मितीवरील निर्बंध उठविण्याची मागणी केली होती. त्या वेळी देशातील साखर हंगाम संपल्यानंतर याबाबत विचार करण्याची ग्वाही शहा यांनी दिली होती.



देशातील साखर हंगाम संपल्यानंतर आता हे निर्बंध हटविण्यात आले असून देशभरात कारखान्यांकडे शिल्लक असलेल्या ऊस रस आणि मळीपासून तयार होणारे इथेनॉल खरेदी करण्याचे आदेश पेट्रोलियम कंपन्याना दिले आहेत. त्यानुसार इंडियन आइल कॉर्पोरेशन, भारत पेट्रोलियम, हिंदुस्थान पेट्रोलियम, मंगलोर रिफायनरी अँड पेट्रोकेमिकल्स लि. या तेल कंपन्यांनी पहिल्या टप्प्यात सुमारे ६६ कोटी लिटर इथेनॉल खरेदी करण्यासाठी निविदा प्रसिद्ध केली असून त्यानुसार कारखान्यांनी देकार सादर करायचे आहेत.

# विठ्ठल कारखान्याचे विठ्ठल मंदिरात अखंड हरिनाम सप्ताह सोहळ्याची सांगता

पंढरपूर/प्रतिनिधी

कारखाना कार्यस्थळावरील श्री विठ्ठल रुक्मिणी श्रीराम लक्ष्मण सीता मारुती या देवतांची प्राणप्रतिष्ठा वर्धापन दिन दिनानिमित्त व सद्गुरु संत तुकाराम यांच्या सुपुत्र अमृत महोत भेजोत्सवानिमित्त अवचित साधून प्रतिवर्षीप्रमाणे अखंड हरिनाम सप्ताहाचे आयोजन केले होते त्याप्रमाणे याही वर्षी दिनांक ९ ५ २०२४ ते १५ ५ २०२४ या कालावधीमध्ये अखंड हरिनाम सप्ताह भागवत कथा ज्ञानेज्ञ सोहळ्याचे आयोजन केलेले होते



कारखान्याची चेअरमन मा श्री अभिजीत धनंजय पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली तसेच संचालक मंडळाच्या उपस्थितीत ह भ प श्री तुकाराम महाराज म्हस्के ह भ प श्री अण्णा महाराज भोसले यांच्या नेतृत्वाखाली अखंड हरिनाम सप्ताह व भागवत कथा ज्ञानयज्ञ सोहळयाचे आयोजन केले होते या सोहळ्यामध्ये पहाटे चार ते सहा काकडा सकाळी दहा ते बारा संत तुकाराम महाराज गाथा भजन व दुपारी चार ते पाच हरिपाठ सायंकाळी सहा ते सात भागवत कथा रात्री आठ ते दहा कीर्तन व रात्री ११ ते ४ हरिजागर इत्यादी दैनंदिन कार्यक्रमाची आयोजन केलेले होते त्यामुळे परिसरातील भावी भक्तामध्ये आनंदाची वातावरण निर्माण होऊन कारखाना परिसर भक्तीमय झालेला होता तसेच दररोज सायंकाळी पाच ते सात या वेळेत मध्ये हभप संगीत विशारद भागवताचार्य सौर आणि ताई शिदवाडकर करकम यांचे भागवत कथा ज्ञान यज्ञाचेही आयोजन केलेले होते सदर कथेच्या श्रावणात कारखाना कॉलनी परिसरातील महिलांचा चांगला प्रतिसाद मिळालेला आहे या सप्ताह मध्ये कारखान्याचे अधिकारी कर्मचारी परिसरातील नागरिक अन्नदान करण्यासाठी मोठा सहभाग नोंदवलेला होता

या सप्ताहाची सांगता भव्य दिव्य दिंडी नगर प्रदक्षिणा हभप डॉ श्री किरण महाराज बोधले श्री संत मानखुजी महाराज यांचे वंशज श्री शेत्र पंढरपूर यांचे काल्याचे किर्तन आणि झालेले ह भ प डॉक्टर श्री किरण महाराज बोधले यांनी अनेक आध्यात्मिक उदाहरणे देऊन काल्याची कीर्तनाचे महत्त्व सांगितले व आपल्या माध्यमिक शैलीमध्ये बोलताना ते म्हणाले की श्री विठ्ठल कारखान्याची धुरा हुशार व्यक्तिमत्व असणाऱ्या अभिजीत पाटील यांच्यासारख्या युवा नेतृत्वाकडे सोपवण्यात सर्व सभासदांचा परिसरांचा सर्वांगीण विकास करण्यासाठी आशीर्वाद दिले तत्पूर्वी दिंडी नगरपरिषणामध्ये प्रचालीचे विद्यार्थी विद्यार्थिनींनी वेगवेगळ्या आकर्षक वेशभूषेध मोठ्या प्रमाणात सहभाग घेऊन पंचक्रोशीतील लोकांची मने आकर्षित केली कालच्या नंतर महाप्रसादाचा सर्वांनी आस्वाद घेतला

सदर कार्यक्रमासाठी सर्व संचालक मंडळ व पूर्व कार्यकारी संचालक श्री डी आर गायकवाड सभासद अधिकारी कर्मचारी कामगार तसेच परिसरातील असंख्य भाविक भक्तांच्या हरिनाम सप्ताह सांगता समारंभ संपन्न झाला



कोल्हापूर येथील महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाच्या विभागीय कार्यालयास पत्रकार संघाचे प्रदेशाध्यक्ष वसंत मुंडे यांनी शुक्रवार दि.१७ मे२०२४रोजी भेट दिली.यावेळी पश्रि्चम महाराष्ट्र उपाध्यक्ष श्रेयस भगवान , कोल्हापूर जिल्हाध्यक्ष बाजीराव फराकटे, यांनी स्वागत केले.यावेळी करवीर तालुका संघटक तानाजी पोवार, उपाध्यक्ष विश्र्वनाथ मोरे, शहर सहसंघटक विनोद लोखंडे , राजेंद्र मकोटे , दयानंद लिपारे, आकाश कांबळे सह पत्रकार उपस्थित होते.

# आपत्कालीन परिस्थितीत सर्व यंत्रणांनी आपसात शंभर टक्के समन्वय ठेवावा

## विभागीय आयुक्त डॉ.चंद्रकांत पुलकुंडवार

पुणे/प्रतिनिधी : विभागातील सर्व जिल्हाधिकाऱ्यांनी आपत्तीपूर्व व आपत्ती काळात आपत्तीला प्रतिसाद देण्यासाठी यंत्रणा सज्ज ठेवावी. तसेच आपत्कालीन परिस्थितीत सर्व संबंधित विभागांच्या अधिकाऱ्यांनी परस्पर समन्वय ठेऊन काम करावे, अशा सूचना विभागीय आयुक्त डॉ. चंद्रकांत पुलकुंडवार यांनी दिल्या.

विधान भवन येथे आयोजित पुणे विभागस्तरीय मान्सूनपूर्व आढावा बैठकीत ते बोलत होते. यावेळी विशेष पोलीस महानिरीक्षक सुनील फुलारी, पुणे महानगरपालिका आयुक्त राजेंद्र भोसले, पिंपरी चिंचवड महानगरपालिका आयुक्त शेखर सिंह, कोल्हापूर महानगरपालिका आयुक्त के. मंजुलक्ष्मी, सातारा जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी, पुणे जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी संतोष पाटील, पुणे ग्रामीण पोलीस अधीक्षक पंकज देशमुख, उपायुक्त रामचंद्र शिंदे आदी उपस्थित होते. सांगलीचे जिल्हाधिकारी डॉ. राजा दयानिधी, कोल्हापूर जिल्हाधिकारी अमोल येडगे, सोलापूर जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद आदी दूरदृश्यप्रणालीद्वारे उपस्थित होते.



यावर्षी हवामान विभागाने सरासरीपेक्षा अधिक पावसाचा अंदाज व्यक्त केला असल्याचे सांगून डॉ. पुलकुंडवार म्हणाले, त्यामुळे सर्व विभागांनी कोण्यात्याही आपत्कालीन परिस्थितीला सामोरे जाण्यासाठी सर्व तयारीनिशी सज्ज असले पाहिजे. आत्पकालीन परिस्थितीत विभाग प्रमुखांनी, समन्वयाची जबाबदारी असलेल्या अधिकारी, कर्मचाऱ्यांनी जिल्हाधिकाऱ्यांच्या परवानगीशिवाय मुख्यालय सोडू नये. सर्व विभागांनी आपले नियंत्रण कक्ष २४ तास कार्यरत ठेवावेत. त्यातील अधिकारी, कर्मचाऱ्यांच्या भ्रमणध्वनी क्रमांकांची देवाणघेवाण करावी. श्री. पुलकुंडवार म्हणाले, अतिवृष्टीमुळे अलमट्टी धरणात येणाऱ्या पाण्याचा विसर्ग वाढल्याने कोल्हापूर, सांगली, सातारा जिल्ह्यात पूरपरिस्थिती निर्माण होते. त्यामुळे पूरनियंत्रणासाठी पाटबंधारे विभागाने आंतरराज्यीय समन्वय राखावा. पाटबंधारे विभागाने धरणातील पाण्याची पातळी लक्षात घेऊन पाणी सोडण्याचे नियोजन करावे, पाण्याचा विसर्ग वाढविण्यापूर्वी पुरेशी पूर्वसूचना द्यावी. धरणभिंती, कालवे संरचनांची तपासणी करुन कुठे गळती असल्यास दुरुस्ती करावी.

पूरप्रवण व दरडग्रस्त क्षेत्रात स्थानिक यंत्रणांनी विशेष खबरदारी घ्यावी, धोकादायक पुलांचे संरचनात्मक अंकेक्षण करावे, जलजन्य आजार पसरु नयेत यासाठी आरोग्य विभागाने सतर्क राहून काम करावे, पशुसंवर्धन विभागाने पशुंचे मान्सूनपूर्व लसीकरण करुन घ्यावे. पशुहानी झाल्यास मृत पशुंची विल्हेवाट लावण्याची व्यवस्था करावी. आपत्कालीन परिस्थितीत आवश्यक असणारी यंत्रसामुग्री तसेच पर्जन्यमापक यंत्रे सुस्थितीत ठेवावीत असे सांगून स्थानिक यंत्रणांनी आपत्तकालीन परिस्थितीची माहिती तातडीने वरिष्ठांना कळवावी अशा सूचना विभागीय आयुक्तांनी यावेळी दिल्या.

श्री. पुलकुंडवार म्हणाले, शहरातील नालेसफाईची कामे तातडीने पूर्ण करावीत. अवैध जाहिरात फलक हटविण्यासह मान्यता असलेल्या जाहिरात फलकांची संरचनात्मक स्थीरता तपासून धोकादायक फलक हटविण्यात यावेत. धोकादायक वाड्यांतील नागरिकांचे स्थलांतर करण्यात यावे. नाले, नदीपात्राच्या कडेची अतिक्रमणे काढण्यात यावीत. तेथील नागरिकांना तात्पुरत्या निवाऱ्यांमध्ये स्थलांतरीत करण्यात यावे.शहरातील रस्त्यावरील खड्डे बुजविण्याचे काम प्राधान्याने करावे, पूरपरिस्थतीनंतर नागरिकांना स्वच्छ पिण्याचे पाणी उपलब्ध करुन द्यावे तसेच पहिल्या पावसानंतर शहरात साठलेला राडारोडा तातडीने हटविण्याची व्यवस्था करावी अशा सूचना महानगरपालिका आयुक्तांना दिल्या. तसेच ग्रामीण भागातील अनधिकृत जाहिरात फलकही हटविण्यात यावेत. महावितरणने विजेचे खांब, तारा यांची तपासणी करुन आवश्यक ती दुरुस्ती करावी. कृषी विभागाने अवकाळी पावसाने झालेल्या नुकसानभरपाईचे प्रस्ताव पाठवावेत, त्याचा पाठपुरावा करण्यात येईल, असेही डॉ. पुलकुंडवार म्हणाले.

यावेळी सुनील फुलारी यांनी पोलीस विभागाच्या तयारीची माहिती दिली तसेच सर्व जिल्ह्यात आपत्कालीन परिस्थितीत उपयोगी ठरु शकतील अशा पोहणाऱ्या व्यक्तींची यादी करण्यात आली आहे. महसूल, ग्रामविकास आणि पोलीस विभागाने समन्वयाने काम करावे, अशा सूचना त्यांनी दिल्या. बैठकीत महानगरपालिका आयुक्त, जिल्हाधिकारी यांनी संबंधित जिल्ह्यात आपत्ती व्यवस्थापनाच्या अनुषंगाने करण्यात आलेल्या पूर्वतयारीची माहिती सादरीकरणाद्वारे दिली. बैठकीत धरणे, नदीनिहाय संभाव्य पूरप्रवण गावे, रस्ते वाहतूक विस्कळीत होण्याची प्रमुख ठिकाणे,

पूरपरिस्थिती उद्भवल्यास करावयाच्या उपाययोजना, नागरिकांचे तात्पुरते स्थलांतरासाठी निवारा केंद्रांची व्यवस्था (शेल्टर्स), पशुधनाची काळजी, आरोग्य विभागामार्फत करावयाच्या उपाययोजना, रेल्वे विभाग, एनडीआरएफ, विद्युत विभाग, कृषी विभाग, सहकार विभाग, हवामान विभाग, जिल्हा परिषद तसेच पोलीस विभागाने करावयाच्या उपाययोजनांचा आढावा संबंधितांकडून घेण्यात आला.

# मराठीला अभिजात दर्जा, सैन्य घुसवून ओवैसीसारख्यांचे अड्डे उद्ध्वस्त करा, राज ठाकरेंच्या बेधडक मागण्या!

मुंबई : शिवाजी पार्कमधील महायुतीच्या सभेत राज ठाकरे यांनी बेधडक भाषण केले. यावेळी त्यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचं कौतुक केले. त्याशिवाय त्यांनी केलेल्या कामाचा पाढा वाचला. राज ठाकरे यांनी मोदी पुन्हा सत्तेत येतील असा विश्र्वास व्यक्त केला. पंतप्रधान नरेंद्र मोदींचे आभार मानत राज ठाकरे यांनी 'आपण आहात म्हणून राम मंदिर होऊ शकलं', असे म्हटले. राज ठाकरे यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्याकडे सहा बेधडक मागण्या केल्या आहेत. पुढच्या पाच वर्षांसाठी मोदीजींसमोर उभा आहे. महाराष्ट्राच्या खूप आपेक्षा आहेत. त्यातील काही गोष्टी सांगत आहे, असे राज ठाकरे म्हणाले.




राज ठाकरेंनी मोदींकडे कोणत्या सात मागण्या केल्या आहेत.

१. अनेक वर्षे खितपत पडलेला मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा मिळावा. २. जवळपास १२५ वर्ष या हिंदभूमीवर मराठा साम्राज्य होतं त्याचा इतिहास देशातल्या प्रत्येक शालेय अभ्यासक्रमात समावेश व्हावा. ३. समुद्रामध्ये छत्रपतींचा पुतळा कधी उभा राहिल माहित नाही. पण शिवछत्रपतींची खरी स्मारके आहेत ती म्हणजे गड किल्ले आहेत. गडकिल्लयांना गतवैभव मिळावं यासाठी आंतरराष्ट्रीय समिती स्थापन करावी. भविष्यातील पिढ्यांना आमचा राजा कोण होता.त्यानं काय इतिहास गाजवला हे त्या गडकिल्लयावरुन कळेल. ४. देशात अनेक रस्ते तयार केलेत. गेली १८-१९ वर्षे मुंबई-गोवा महामार्ग तसाच आहे. तो लवकरात लवकर व्हावा, ही विनंती आहे. ५. बाबासाहेब आंबेडकरांच्या सविंधानांना धक्का लावणार नाही, हे खडसावून सांगा. ६. देशात लाखो, करोडो मुसलमान आहे, त्यांची देशावर निष्ठा आहे. पण काही मुठभर आहेत, जे काँग्रेस, ठाकरेंना पाठिंबा देणारे आहेत, त्यांचा उदेश फक्त दहा वर्षात डोक वर करता आलं नाही. डोक वर काढण्याचा सुलभ मार्ग कोणता, तर काँग्रेसशिवाय त्यांना मार्ग नाही. त्यामुळे त्यांना पाठिंबा देत आहेत. पण लाखोंच्या संख्येनं मुस्लीम आपल्यासोबत आहे, त्याला शाश्र्वती हवी, त्याला आदर आहे, त्याला देशामध्ये काम करायचं आहे. नागरिक आहे. तो पिढ्या न पिढ्या राहणार आहे. पण हे मुठभर आहेत, ओवैसीसारख्या औलादी आहेत, त्यांचे जे अड्डे आहेत, ते अड्डे तपासून घ्या.. तिथे माणसं घुसवा. देशाची सैन्य घुसवा आणि त्यांना उध्वस्त करून टाका. म्हणजे देशात सर्वांना सुरक्षित वावरता येईल. ७. मुंबई रेल्वेकडे लक्ष द्यावे, जास्तीत जास्त पैसे द्यावेत.

मोदीजी तुम्ही होतात म्हणून अयोध्येत राममंदिर उभं राहिलं. काश्मीरला विशेष दर्जा देणारा ३७० कलम तुमच्यामुळेच हटवलं गेलं. काश्मीर भारताचा भाग आहे हे ३७० कलम घटनेनंतर भारतीयांना पहिल्यांदा वाटू लागले. शाहबानो प्रकरणात सर्वोच्च न्यायालयाने पोटगीच्या बाजूने न्याय दिला होता, पण राजीव गांधींनी कायदा संमत करून सर्वोच्च न्यायालयाचा निर्णय रद्द केला. पण मोदीजींनी याच पीडित मुस्लिम महिलांना ट्रिपल तलाकमधून बाहेर काढलं, त्यांच्यावर जो अन्याय होतोय तो अन्याय कायमचा दूर झाला. त्याबद्दल तुमचं अभिनंदन

२०१४-१९ च्या मोदीजींच्या कार्यकाळाबद्दल मला जे बोलायचं होतं ते मी २०१९ ला बोललो. आता २०१९ ते आत्तापर्यंतचं बोलूया. इथल्या वक्त्यांनी उद्धव ठाकरे आणि शरद पवार यांच्यावर टीका करून वेळ वाया घालवला. माझ्या मते त्यांच्याबद्दल बोलून काही उपयोग नाही. कारण ते सत्तेत येणार नाहीत. पण २०१९ ते २०२४ काळात मोदीजींनी जी कामं केली त्याबद्दल मी तुमचे आभार मानू इच्छितो. पंडित जवाहरलाल नेहरू यांच्या नंतर तिसऱ्यांदा देशाचे पंतप्रधान होणारे नरेंद्र मोदी हे बरोबर २१ वर्षांनी शिवतीर्थावर आलेत. त्यावेळेस आपण कमळातून बाहेर आला होतात आणि २०१४ ला आपण कमळाला बाहेर काढलंत.

# अपना घर (कर्करोग रूग्णसेवा) पुणे येथे सर्पमित्रांनी केले सापाविषयी जनजागृती

### वन्यजीव – पर्यावरण संवर्धन काळाची गरज सर्पमित्र साईदास कुसळ



पुणे : कर्करोग रुग्णांची सेवा व सुविधा पुरविणाऱ्या अपणा घर पुणे सुलतान सोसायटी कोरेगाव पार्क येथे पुणे जिल्ह्यातील अनुभवी सर्पमित्र म्हणून ओळखले जाणारे साईदास कुसळ व त्यांच्या संपूर्ण टीमने कर्करोग रुग्णसेवा देणारे अपना घर येथे सापांविषयी श्रध्दा अंधश्रद्धा दूर केली. वन्य जीवाचे आणि पर्यावरणाचे संवर्धन करणे ही काळाची गरज आहे हल्ली सापाची संख्या ही कमी होत आहे त्यामुळे साप हा निसर्गाचा एक मुख्य घटक असून तो निसर्गाचा समतोल राखतो आणि मानवाचा शेतकऱ्याचा मित्र देखील आहे. भारतामध्ये प्रामुख्याने ५ विषारी जातीचे साप आढळतात. या सापांमध्ये प्रथम येणारा भारतीय नाग, मण्यार, घोणस, फुरसे, आणि चापडा, पोवळा हे प्रामुख्याने ६ सापाच्या विषारी जाती आहेत. त्या भारतामध्ये आढळतात. याव्यतिरिक्त आढळणारे साप हे बिनविषारी असून साप चावल्यास घाबरून न जाता योग्य रित्या उपचार हा त्यावरती केला पाहिजे. कुठलाही अंधश्रद्धेला बळी न पडता यामध्ये कुठल्याही बुवा बाबाकडे किंवा घरेलू उपचार न करता जवळच्या रुग्णालयामध्ये जाऊन अथवा शासकीय रुग्णालयामध्ये जाऊन त्यावरती उपचार घ्यावा असे आव्हान सर्पमित्र साईदास कुसळ , विष्णू पायघन, अनिकेत गायकवाड, विजय राजपूत, विशाल तलसानिया, यांनी पूर्ण टीम ने केले आहे.या कार्यक्रमाचे आयोजन कुणाल पाटकर, सुरज माळी यांनी केले होते. सापा विषयी जागरूकता निर्माण व्हावी याकरिता या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

मार्केट का सुरज माळी यांनी कर्करोग हे जगभरातील मृत्यूचे दुसरे प्रमुख कारण आहे.दरवर्षी १० दशलक्ष लोक कर्करोगाने मरतात.कर्करोगाशी संबंधित ४०% पेक्षा जास्त मृत्यू टाळता येऊ शकतात कारण ते धूम्रपान, अल्कोहोल वापरणे, खराब आहार आणि शारीरिक निष्क्रियता यासारख्या बदलण्यायोग्य जोखीम घटकांशी संबंधित आहेत.कर्करोगाशी संबंधित सर्व मृत्यूंपैकी किमान एक तृतीयांश मृत्यू नियमित तपासणी, आणि लवकर ओळख आणि उपचारांद्वारे रोखले जाऊ शकतात. महिती दिली.साप चावल्यास काय करावे ; विषारी साप ज्या ठिकाणी चावला त्या ठिकाणी जास्त हालचाल करू नये सापाने त्या ठिकाणी चावा घेतला ती जागा स्वच्छ पाण्याने साबणाने धुवून घ्यावी घाबरून न जाता शांततेने ४० ते ५० मिनिटापर्यंत रुग्णालयापर्यंत पोहोचावे. कुठला सापचावला आहे बघाव्यात. अथवा फोटो काढून डॉक्टरांना दाखवण्याचा प्रयत्न करावा.

साप चावल्यास हे करू नये ; साप चावल्यास कुठल्याही प्रकारचा मंत्र तंत्र उपचार करू नये कुठल्याही बुवा बाबाकडे जाऊन अंधश्रद्धेला बळी पडू नये साप चावलेल्या ठिकाणी ब्लेड अथवा चाकूने वार करू नये चावलेल्या ठिकाणी तोंडाने विष काढण्याचा प्रयत्न करू नये तिखट मिरची लिंबाचा पाला हे खाण्याचा प्रयत्न करू नये. त्याच बरोबर घराच्या आसपास कोठेही साप पशू-पक्षी कोणताही वन्यजीव आढळून आल्यास त्याला न मारता जवळच्या प्राणी मित्र यांच्याशी संपर्क करावा असे आवाहन निता साईनाथ कुसळ,विष्णू पायघन,अनिकेत गायकवाड, विजय राजपूत,विशाल तसलीम, प्रदिप पट्टेबजदुर या सर्पमित्रांनी केले आहे.

# अमेरिकेतील विद्यार्थिनींची स्वेरीला सदिच्छा भेट




पंढरपूर/प्रतिनिधीः भारताचे थोर शास्त्रज्ञ, पद्मविभूषण डॉ. अनिल काकोडकर यांच्या हस्ते स्वेरीमध्ये संशोधन विभागाची मुहूर्तमेढ रोवली गेली. तेंव्हापासून शिक्षणाबरोबरच संशोधन विभागात देखील स्वेरी चमकदार कामगिरी करत आहे त्यामुळे राज्य व देशभरातील शास्त्रज्ञांचे व शिक्षणतज्ञांचे लक्ष स्वेरीतील संशोधनावर लक्ष केंद्रित झाले आहे. स्वेरीच्या यशाचा चढता आलेख पाहून अनेक शिक्षणतज्ञ व संशोधक स्वेरीला आवर्जून भेट देत असतात. त्या अनुषंगाने अमेरिकेतील दोन विद्यार्थिनींनी नुकतीच स्वेरीला सदिच्छा भेट दिली आणि संशोधन विभागाची पाहणी केली.

गोपाळपूर (ता. पंढरपूर) येथील स्वेरी संचलित कॉलेज ऑफ इंजिनिअरींगच्या संशोधन विभागाला अमेरिकेत राहणाऱ्या व 'अमेरिकन नेहरू फुलब्राइटर्स स्कॉलर्स' म्हणून भारतात पुणे येथे संशोधन करण्यासाठी आलेल्या अरुणा खारोड व अक्षाली गांधी या दोन विद्यार्थीनींनी भेट देवून संशोधन विभागाची सविस्तर माहिती जाणून घेतली.

प्रथम अरुणा खारोड यांनी स्वेरीत येण्यामागचा हेतू स्पष्ट केला. यापूर्वी 'स्टडी ऑफ सोलार डिप्लॉयमेंट इन पंढरपूर' या विषयावर स्वेरीमध्ये संशोधन करण्यासाठी 'नेहरू पुलब्राईट यु.एस. स्टुडंट रिसर्च प्रोग्राम' च्या माध्यमातून वर्जीनिया (वॉशिंग्टन, अमेरिका) मधील झॅकरी मरहंका हे आले असून त्यांचा संबंधित विषयाचा अभ्यास वर्तमानात सुरू आहे.

मरहंका यांच्या माध्यमातून स्वेरीतील संशोधनाची झेप ही अरुणा खारोड व अक्षाली गांधी यांच्यापर्यंत पोहचली त्यामुळे त्यांना स्वेरीला भेट देण्याची इच्छा निर्माण झाली. प्रारंभी स्वेरीचे संस्थापक सचिव व कॉलेज ऑफ इंजिनिअरिंगचे प्राचार्य डॉ. बी.पी.रोंगे व पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूरच्या विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखेचे प्रभारी अधिष्ठाता डॉ.पी.एम.पवार यांनी अरुणा खारोड व अक्षाली गांधी या दोन्ही विद्यार्थिनींचे स्वागत केले. अरुणा खारोड ह्या सितार वादक आणि सितार निर्मितीवर संशोधन करत आहेत तर अक्षाली गांधी ह्या वाढत्या वाहनांमुळे रस्त्यावर वाढत जाणारी गर्दी या विषयाला अनुसरून 'वाहतूक नियोजन' यावर संशोधन करत आहेत.

अरुणा खारोड व अक्षाली गांधी यांनी कॉलेज ऑफ इंजिनिअरींगचे सर्व विभाग, संशोधन विभाग, विविध संशोधन सुविधा यांचे निरीक्षण करून माहिती जाणून घेतली. संशोधन प्रकल्प, परिसर, शिक्षण पद्धती, विद्यार्थ्यांमध्ये असलेली शिस्त व संस्कार, प्राध्यापक व विद्यार्थी यांच्यातील संवाद आदी बाबी पाहून त्या भारावून गेल्या. यावेळी स्वेरीचे संस्थापक सचिव आणि अभियांत्रिकी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. बी. पी. रोंगे, संशोधन आणि विकास विभागाचे अधिष्ठाता डॉ. ए.पी. केने व इतर प्राध्यापक उपस्थित होते.

